जा.क्र.शिउसं/कोवि/उमा२/उमाजातु/०८-०९/ २४९३-०२
शिक्षण उपसंचालक कार्यालय,कोल्हापूर
दिनांक १३/१/२००९

22 JAN 2009

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य
छत्रपती शिवाजी ज्युनियर कॉलेज नेसरी
ता. गडहिंग्लज जिल्हा कोल्हापूर

विषय:- शैक्षणिक वर्ष २००८-०९ मध्ये इयत्ता ११ वी च्या अतिरिक्त
तुकडया/शाखा **कायम विनाअनुदान** तत्वावर मंजूर करण्‍बाबत
संदर्भ:- मा शिशक्षण संचालनालयाकडील एचएससी १५२००८/१२एचएस/
११ वी जातु/दिनांक ३०/७/२००८.

उपरोक्त संदर्भीय शासनपत्रान्वये आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील सन २००८-०९ या शैक्षणिक वर्षापासून खालील वर्ग/तुकडयाना **कायम विनाअनुदान** तत्वावर मान्यता देण्यात येत आहे.

| इयत्ता | कला | विज्ञान | वाणिज्य | संयुक्त | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| ११ वी | -------- | एक प्रथम | एक प्रथम | ------- | दोन |

१. या नवीन उच्च माध्यमिक वर्गास शासनाने **कायम विनाअनदान** तत्वावर मंजुरी दिली असून भविष्यात कधीही अनुदान तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत देण्यात येणार नाही
२ शासन निर्णय शिक्षण व युवक सेवा विभाग क्र एचएससी १०७६/४१९/२०-२१ दिनांक ६/५/१९७६ व त्यानंतर वेळोवेळी विहित केलेली सरासरी हजेरी,पुरेशी इमारत,अर्हता प्राप्त शिक्षक, शैक्षणिक साहित्य, ग्रंथालय विज्ञान साहित्यासह सुसज्ज प्रयोगशाळा इत्यादी बाबींची सुविधा असणे आवश्यक आहे. मंजूर केलेल्या वर्गात विहित क्षमतेपेक्षा जादा विद्यार्थ्यांना या कर्यालयाच्या पूर्वपरवानगीशिवाय प्रवेश देता येणार नाही, तसेच माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी सेवेच्या शर्ती नियमावली १९८१ चे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक राहील.
३.शासनाच्या पूर्वपरवानगीने निश्चित केलेले शिक्षण शुल्कच विद्यार्थ्यांकडून आकारणे संस्थेवर बंधनकारक आहे.
४. संस्थेची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.
५. संस्थेने खात्याशी,शासनाशी पत्रव्यवहार करताना **कायम विनाअनुदानित उच्च माध्यमिक वर्ग** तुकडी अशा प्रकारचे लेटरहेड वापरणे आवश्यक आहे.
उपरोक्त अटींची पूर्तता न झालेचे आढळून आल्यास मान्यता काढून घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

शिक्षण उपसंचालक
कोल्हापूर विभाग कोल्हापूर

प्रत माहिती व जरुर त्या कार्यवाहीसाठी शिक्षणाधिकारी माध्यमिक जिल्हा परिषद कोल्हापूर